**सर्व शिक्षा अभियान व राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान अंतर्गत बांधकामांची गुणवत्ता तपासणी अभियांत्रिकी महाविदयालय/ तंत्रनिकेतन या त्रयस्थ यंत्रणेमार्फत करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

## शासन निर्णय क्रमांकः एसएसए-१४१३/प्र.क्र. ३५६/प्राशि-४

मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई
दिनांक: ०४ सप्टेंबर, २०१३

**प्रस्तावना -**

बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ (RTE Act २००९) ची अंमलबजावणी देशात १ एप्रिल, २०१० पासून सुरु झाली आहे. कायद्यातील तरतुदीप्रमाणे ६ ते १४ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना मोफत, सक्तीचे व गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे हा बालकांचा मूलभूत अधिकार असून या अधिकाराची अंमलबजावणी शासन, शाळा, शिक्षक व पालक यांनी करावयाची आहे.

शाळेमध्ये दर्जेदार भौतिक सुविधा उपलब्ध करुन देणे शासन, स्थानिक प्राधिकरण व शाळांची जबाबदारी आहे. सर्व शिक्षा अभियानांतर्गत बांधकाम या उपक्रमामध्ये शाळा इमारत बांधकाम, वर्गखोल्या बांधकाम, स्वच्छतागृहे, विद्युतीकरण इत्यादी मूलभूत सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. शालेय व्यवस्थापनात जनतेचा सहभाग वाढावा आणि लोकांमध्ये सामायिक मालकीची जाणीव निर्माण व्हावी यादृष्टीने सर्व शिक्षा अभियानांतर्गत करण्यात येणारी बांधकामे शाळा व्यवस्थापन समितीमार्फत करण्यात येतात. सदर बांधकामांना सर्व शिक्षा अभियानांतर्गत कार्यरत अभियंते तांत्रिक मार्गदर्शन करतात.

या बांधकामाचा दर्जा व गुणवत्ता तपासणीकरीता वेगळी यंत्रणा सर्व शिक्षा अभियानातंर्गत उपलब्ध नाही. ही बाब विचारात घेवून त्रयस्थ यंत्रणेमार्फत बांधकामाची गुणवत्ता व दर्जा तपासणे, मार्गदर्शन करणे आणि त्याप्रमाणे बांधकाम झाले किंवा नाही याची खात्री करुन प्रमाणिकरण करणे इत्यादी कामे करण्यासाठी त्रयस्थ यंत्रणेची नेमणूक भारत सरकारच्या निर्देशानुसार करावयाची आहे. दिनांक १६ ऑक्टोबर, २०१२ रोजीच्या ५५ व्या कार्यकारी समितीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार हे काम अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रनिकेतने यांच्याकडून करुन घ्यावयाची बाब शासनाच्या विचारधीन होती.

**शासन निर्णय-**

सर्व शिक्षा अभियान व राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान अंतर्गत सन २०११-१२ व सन २०१२-१३ मधील मंजूर असलेल्या बांधकामापैकी पूर्ण झालेल्या बांधकामाची गुणवत्ता व दर्जा तपासणे,

बांधकामातील त्रुटया व उणिवा कनिष्ठ अभियंता आणि कार्यकारी अभियंता यांचे निदर्शनास आणून देवून यावर उपाययोजना सुचविण, मार्गदर्शन करणे व बांधकामाची गुणवत्ता प्रमाणित करणे, सदर तपासणीचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद / आयुक्त , महानगरपालिका यांना सादर करणे. या कामाकरिता शासकिय तंत्रनिकेतने / अभियांत्रिकी महाविद्यालये, अनुदानित तंत्रनिकेतने /अभियंत्रिकी महाविद्यालये यांची नियुक्ती करण्यास शासन मान्यता देत आहे.

**<u>बांधकामाची गुणवत्ता तपासणीची कार्यपध्दती खालीलप्रमाणे राहील -</u>**

१) राज्यात सर्व शिक्षा अभियान व राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान अंतर्गत सन २०११-१२ व २०१२-१३ मधील जिल्हा व महानगरपालिकाकरिता मंजूर असलेल्या बांधकामापैकी पूर्ण झालेल्या शाळा / वर्गखोली बांधकामांची गुणवत्ता तपासणी (Quality Audit) करावयाची आहे.

२) शासकीय तंत्रनिकेतने / अभियांत्रिकी महाविद्यालये आणि अनुदानित तंत्रनिकेतने / अभियांत्रिकी महाविद्यालये हे त्या त्या जिल्हयातील शाळा / वर्गखोली बांधकामाची गुणवत्ता तपासणी (Quality Audit) करतील.

३) सदर बांधकामांच्या गुणवत्ता चाचणीकरीता Non-Destructive Test / Rebound Hammer Test / Core Test/ Ultra Violet Pulse Velocity Test पैकी एक चाचणी घ्यावयाची आहे. शिक्षणाधिकारी (प्राथ.)/शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी यापैकी कोणतीही एक चाचणी निश्चित करावी.

४) संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई यांनी सदर कामाकरिता इच्छूक व तपासणीकरीता यंत्रे व मनुष्यबळ उपलब्ध असणा-या शासकीय तंत्रनिकेतने / अभियांत्रिकी महाविद्यालये, अनुदानित तंत्रनिकेतने / अभियांत्रिकी महाविद्यालये यांची निवड करुन यादी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांचेकडे पाठवावी व महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने सदर नावे संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी / आयुक्त यांना कळवावी.

५) सदर निवड केलेल्या तंत्रनिकेतने / अभियांत्रिकी महाविद्यालयांकडून दरपत्रके मागवून किमान दर असलेल्या तंत्रनिकेतन /अभियांत्रिकी महाविदयालयासाठी निवड करुन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद / आयुक्त, महानगरपालिका यांनी करार करावा.

६) संचालक, तंत्रशिक्षण यांनी निवड केलेल्या तंत्रनिकेतने / अभियांत्रिकी महाविद्यालयांकडून गुणवत्ता तपासणीकरीता बांधकाम अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १.५% मर्यादेत शुल्क अदा करता येईल.

७) बांधकाम गुणवत्ता चाचणीकरीता निवड केलेल्या शाळांची यादी शिक्षणाधिकारी (प्राथ.)/ शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी संबंधित संस्थेस द्यावी.

८) शाळा / वर्गखोली बांधकामाच्या अंदाजपत्रकामध्ये ३% आकस्मिक खर्चाकरिता राखून ठेवलेल्या निधीमधून गुणवत्ता तपासणीचा आवश्यक खर्च करण्यात यावा.

९) या कामाकरिता एकूण शुल्कापोटीच्या रक्कमेपैकी ५०% रक्कम अग्रिम स्वरुपात व उर्वरित शिल्लक रक्कम काम पूर्ण झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी / आयुक्त यांनी अदा करावी.

१०) सदरील काम विहित मुदतीत पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी संबंधित अभियांत्रिकी महाविदयालय / तंत्रनिकेतन यांची असेल.

११) बांधकाम गुणवत्ता तपासणी केलेल्या कामाच्या प्रगतीचा अहवाल दर पंधरा दिवसांनी शिक्षणाधिकारी (प्राथ.) व शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी अनुक्रमे शिक्षण संचालक (प्राथ.) व शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.) यांना सादर करावा. शिक्षण संचालक (प्राथ.) व शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.) यांनी या प्रगतीबाबत शासनास वेळोवेळी अवगत करावे. तसेच शिक्षण संचालकांनी दरमहा राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना गुणवत्ता तपासणी केलेला शाळानिहाय अहवाल सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०९०४१८०३२७५८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Nana Uttamrao Raurale

Digitally signed by Nana Uttamrao Raurale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=School Education & Sports Dept, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Nana Uttamrao Raurale
Date: 2013.09.06 12:03:06 +05'30'

**(ना.उ.रौराळे)**
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
४. मा.मंत्री / राज्यमंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. मंत्री / राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य विधान भवन, मुंबई
७. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई

८. सर्व मंत्रालयीन विभाग
९. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
१०.संचालक, उच्च व तंत्र शिक्षण संचालनालय, ३ महानगरपालिका मार्ग, मुंबई
११. शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.), महाराष्ट्र राज्य, पुणे
१२. शिक्षण संचालक (प्राथ.), महाराष्ट्र राज्य, पुणे
१३. सर्व विभागीय उपसंचालक
१४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिाद
१५. सर्व आयुक्त, महानगरपालिका
१६. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)
१७. सर्व कार्यासने, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. निवड नस्ती, प्राशि-४